# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १७६-२२** **दिनांक :- १०/०६/२०२२**

## कौटुंबिक हिंसाचाराअंतर्गत पीडित महिलेला सेंट्रल आफ्रिका येथे मदत मिळवून देवून तिला परत भारतात सुखरूप पालकांच्या ताब्यात देण्याबाबत भरोसा सेलची उत्कृष्ट कामगिरी.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत भरोसा सेल (गुन्हे शाखा) भाईंदर पश्चिम येथे एका महिलेने तक्रार अर्ज करुन त्यामध्ये नमुद केले की, 'तिच्या मुलीचे लग्न एक वर्षापुर्वी झालेले असुन तिचा जावई हा सेंट्रल आफ्रिका येथे नोकरीस आहे. मागील दिड महिन्यांपुर्वी त्यांचा जावई सेंट्रल आफ्रिका येथे सदर मुलीस घेवून गेला असून सेंट्रल आफ्रिका येथे पोहचल्यानंतर जावयाने तक्रारदार महिला यांना एक फोन करून कळविले की, ते सेंट्रल आफ्रिका येथे सुखरुप पोहचले आहे. त्यांनतर जावयाने त्याचा स्वतःचा फोन बंद करून ठेवला व त्यांचे मुलीकडुनदेखील तिचा मोबाईल फोन काढून घेतला. तेव्हापासुन त्यांच्या मुलीसोबत त्यांचे काहिएक बोलणे झाले नाही. मात्र मुलीच्या घरी घरकामासाठी येणा-या महिलेला त्यांचे मुलीने मोबाईल फोन वापराकरिता सतत विनवणी केल्यावरुन दिड महिन्यानंतर तक्रारदार यांचेशी व्हॉटसॲपव्दारे व्हिडीओ कॉल करून सांगितले की, तिचा पती तिला रोज मारहाण करत असुन तिचा फोन देखिल त्याने काढून घेतला आहे तसेच तिला भारतात परत यायचे असुन तिचा पती तिला बाहेर कुठेही जावू देत नसल्याचे सांगितले.

तक्रारदार महिला ही पीडित महिलेची आई असुन त्यांनी भरोसा सेल, भाईंदर प येथे त्यांच्या मुलीसोबत कौटुंबिक हिंसाचार होत असुन तिला परत भारतात आणण्यासाठी दिनांक ०३/०६/२०२२ रोजी तक्रारी अर्ज केला होता. भरोसा सेलच्या सपोनि तेजश्री शिंदे यांनी सदरील गंभीर प्रकार लक्षात घेवून तात्काळ श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मदतीने व श्री महेश पाटील, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि यांचे मार्फतीने इंडिअन एम्बसी, डेमोक्रेटीक रिपब्लिक ऑफ कॉन्गो, गबॅान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक यांना पत्रव्यवहार करून पिडीत महिलेचे पती सेंट्रल आफ्रिका येथील एका कंपनीत नोकरी करत असुन ते त्यांचे पत्नीचा कौटुंबिक हिंसाचाराअंतर्गत छळ करत असून तिला परत भारतात यायचे आहे करिता तिला तात्काळ मदत मिळण्याबाबत कळविले. इंडियन ॲम्बसीच्या अधिका-यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून तात्काळ पीडित महिलेचे पती जिथे काम करतात त्या कंपनीला संपर्क साधून पीडित महिलेची सुटका करून तिला सुरक्षित ठिकाणी हलवले. पीडित महिलेला पुन्हा भारतात यायचे असल्याने इतर तांत्रीक बाबींची पुर्तता तसेच कोवीड-१९ ची तपासणी करून दि. ०९/०६/२०२२ रोजी तिला विमानाने परत भारतात पाठवले. सपोनि तेजश्री शिंदे यांनी मुंबई विमानतळ येथे सदर तक्रारदार महिला यांचेसोबत जावून पीडित

महिलेला आज दिनांक १०/०६/२०२२ रोजी सुरक्षित रित्या तिच्या आईच्या ताब्यात दिले आहे. तसेच सदर मुलीचा सविस्तर जबाब नोंद करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

कौटुंबिक हिंसाचाराअंतर्गत भारतीय महिला नागरिकास परदेशातून परत भारतात आणण्याची ही पहिलीच घटना असून भरोसा सेलच्या मार्फतीने सदरील मुलगी सुखरुप ताब्यात मिळाल्याने तक्रारदार महिला यांनी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे आभार मानून आनंद व्यक्त केला आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली भरोसा सेल, भाईंदर कक्षाच्या सपोनि/तेजश्री शिंदे, पोहवा/सचिन तांबवे, मपोशि/आफ्रिन जुन्नैदी यांनी केलेली आहे.

---ooo---